# महाराष्ट्र मेट्रो रेल कॉर्पोरेशन लिमिटेड
# (नागपूर मेट्रो रेल प्रकल्प )

## नागपूर महानगरपालिकेच्या मतदानाच्या दिवशी मेट्रो सेवा सकाळी ५ ते मध्यरात्री १२ पर्यंत




नागपूर: नागपूर महानगरपालिकेची निवडणूक गुरुवार, दिनांक १५ जानेवारी रोजी पार पडणार आहे. मतदानाची वेळ सकाळी ७.३० ते संध्याकाळी ५.३० असून निवडणूक प्रक्रियेत सहभागी असलेल्या मतदान केंद्रावरील अधिकारी व कर्मचाऱ्यांना प्रवासासाठी सुलभता मिळावी, यासाठी मतदानाच्या दिवशी नागपूर मेट्रोची सेवा विशेष स्वरूपात वाढविण्यात आली आहे.

राज्य निवडणूक आयोगाच्या निर्देशानुसार, गुरुवार, १५ जानेवारी रोजी मेट्रो सेवा सकाळी ५.०० वाजेपासून मध्यरात्री १२.०० वाजेपर्यंत उपलब्ध राहणार आहे.

या निर्णयामुळे निवडणूक कर्तव्यावर असलेले कर्मचारी तसेच नागरिकांना सुरक्षित, सुलभ व वेळेवर प्रवासाची सुविधा उपलब्ध होणार आहे.